**अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलती**

**महाराष्ट्र शासन**
शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि-५
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ सप्टेंबर, २००३

**परिपत्रक :**

अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १२ वीपर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक-एसएससी १०९९/१५१/९९/उमाशि-२, दिनांक २८ नोव्हेंबर, २००० आणि शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक- सकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि-५, दिनांक १३ नोव्हेंबर,२००१ नुसार विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्यादृष्टीने शिफारस करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक-सीपीटी २०००/३५०६/१३१०/प्राशि-२, दिनांक १६ जोनवारी, २००१ नुसार एक समिती गठित करण्यात आलेली होती. या समितीची दुसरी बैठक दिनांक १६ ऑगस्ट, २००३ रोजी झाली व या समितीने अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना वेळोवेळी ज्या सवलती दिलेल्या आहेत त्या पुनश्च परिपत्रकाद्वारे संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात असा निर्णय घेतला. त्यानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अध्ययन अक्षमता असलेल्या ज्यामध्ये डिसलेक्सिया, डिसग्रॉफिया, डिसकॅक्लुलिया या प्रकारच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी पुढील सवलती उपलब्ध आहेत :-

**अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रचलित सवलती -**

१) अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १ ली ते इयत्ता ९ वी आणि इयत्ता ११ वीसाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेबरोबरच तोंडी परीक्षा संबंधित विषय शिक्षकांनी घटक चाचणीच्या व सत्र परीक्षांचे वेळी घेण्यात यावी. या गुणांची नोंद ठेवून वर्षाची सरासरी काढावा. या प्राप्त गुणांच्या आधारे वर्गोन्नती निश्चित करावी.
२) अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वीपर्यतच्या सर्व विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेच्यावेळी लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच त्यांना प्रत्येक परीक्षेसाठी निर्धारित वेळेपेक्षा अर्धातास (३० मिनिटे ) जादा वेळ देण्यात आला आहे.
३) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या परीक्षांचे परीक्षा केंद्र त्यांच्या घराजवळचे घेता येईल.

४) या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेत आकृत्या, नकाशे, आलेख काढण्यापासून सूट देण्यात आलेली असून, सदर प्रश्नांचे/उप प्रश्नांचे ( भूमिती, विज्ञान व भूगोल विषयातील ) गुण त्यांना रुपांतरित करुन देण्याची सुविधा आहे.
५) या विद्यार्थ्यांना कार्यानुभव, समाजसेवा, तंत्र विषय सारख्या प्रात्यक्षिके कराव्या लागणाऱ्या विषयांसाठी, त्यांच्याकरिता असलेल्या संबधित अधिकृत संस्थांची प्रात्यक्षिके पूर्ण केल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करण्याची परवानगी आहे.
६) फक्त अध्ययन अक्षमता असलेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी जास्तीत जास्त २० इतके सवलतीचे गुण देण्यात येतात. हे गुण एकाच विषयात वा जास्त विषयात दिले जातात.
७) डिसलेक्सिया व डिसग्राफिया हे वैगुण्य असलेल्या विद्यार्थ्यांना तीन भाषा विषयांपैकी फक्त दोन भाषा विषय व तिसऱ्या भाषेऐवजी कार्यानुभवातर्गत असलेल्या विषयापैकी कोणताही एक विषय घेण्याची परवानगी देण्यात आली आहे.
८) अध्ययन अक्ष्याता असलेल्या विद्यार्थ्यांना स्पेलींगच्या व गणितातील आकडेमोडाच्या ( आकडे उलट सुलट लिहिणे ) चुकांमध्ये सवलत देण्यात येत आहे.
९) या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत एक तासाच्या पेपराला २५ टक्के जादा वेळ ( १५मिनिटे ) २ तास किंवा अधिक वेळेच्या पेपराला जास्तीतजास्त ३० मिनिटे जास्त वेळ देण्यात येतो.
१०) विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित विद्यार्थ्यांची अध्ययन अक्षमतेबाबत योग्य त्या वैद्यकिय अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्रानुसार विद्यार्थ्यांना अध्ययन अक्षमतेच्या संवर्गात असल्याचे प्रमाणित करावे. तसेच या सवलतीबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी त्यांच्या क्षेत्रातील शाळेच्या मुख्याध्यापकांना तपशिलवार सूचना द्याव्यात. या वर्गातील पात्र विद्यार्थी शासनाने मान्य केलेल्या सवलती पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**<u>समितीच्या शिफारशीनुसार प्रचलित तरतूदीमध्ये करण्यात येत असलेले बदल-</u>**

१) सध्या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वीमध्ये इयत्ता ७ वीचे अंकणित ( ७५ गुण ) व कार्यानुभव ( ७५ गुण ) अशी एकूण १५० गुणांची परीक्षा घेण्यात येते. याच धर्तीवर इयत्ता ८ वीसाठी इयत्ता ५ वीचे अंकगणित ( ७५ गुण ) + कार्यानुभव ( ७५ गुण ) व इयत्ता ९ वीसाठी इयत्ता ६ वीचे अंकगणित ( ७५ गुण ) + कार्यानुभव ( ७५ गुण ) याप्रमाणे इयत्ता ८ व ९ वीसाठी १५० गुणांची परीक्षा घेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. यामध्ये समितीच्या शिफारशीनुसार अंशतः बदल करुन पुढीलप्रमाणे सवलत उपलब्ध करण्यात येत आहे :

अध्ययन अक्षमता असलेल्या समितीने सूचित केल्यानुसार यापुढे अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ५ वी व ६ वी या दोन वर्गासाठी इयत्ता ५ वीचे गणित, इयत्ता ७ वी व ८ वीच्या दोन वर्गासाठी इयत्ता ६ वी चे गणित, इयत्ता ९ वी व १० वीच्या वर्गासाठी इयत्ता ७ वीचे गणित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी राहील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १० वीव्या परीक्षेसाठी इयत्ता ७ वीच्या गणित विषयाचा संपूर्ण अभ्यासक्रम घ्यावा.

२) सध्या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात मान्य असलेल्या कोणत्याही विषयाबाबत जेथे आवश्यक आहे तेथे मुख्याधापकाच्या मान्यतेने ते कार्यानुभव विषय बाह्य शासन

मान्य खाजगी संस्थांकडून पूर्ण करता येईल. तथापि संबंधित विद्यार्थ्यांना तो कार्यानुभव विषय येतो आहे किंवा नाही याची खात्री त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी करावी अशी तरतूद आहे त्यामध्ये अशंतः बदल करुन पुढीलप्रमाणे सुधारित सवलत देण्यात येत आहे -

अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेमध्ये कार्यानुभव या विषयाअंतर्गत जे विषय शिकविले जातात ते विषय प्रथम निवडणे आवश्यक राहील. तथापि, या व्यतिरिक्त कार्यानुभवाचा विषय निवडण्यास त्यांना मुभा राहील. या विषयाचे शिक्षण त्यांनी मान्यताप्राप्त खाजगी संस्थेमार्फत घ्यावे व त्या संस्थेचे प्रमाणपत्र संबंधित शाळा स्वीकारतील.

**अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही -**

१) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना, त्याबाबतचे प्रमाणपव संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांनी एकदा दिल्यानंतर शाळांनी अशा प्रमाणपत्राची वारंवार मागणी करु नये.

२) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी किंवा शिक्षण निरिक्षकांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील शाळेच्या मुख्याध्यापकांची सभा घेतील व अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने दिलेल्या सोई-सुविधा याची माहिती मुख्याध्यापकांना देतील. या बैठकीच्या वेळी शक्यता महाराष्ट्र राज्य डिसलेक्सिया असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविण्यात यावे.

३)अध्ययन अक्षमता असलेले जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा १७ नंबरचा फॉर्म भरुन परीक्षेस प्रविष्ठ होतील अशा विद्यार्थ्यांनी अध्ययन अक्षमतेबाबतचे प्रमाणपत्र मंडळाला सादर करणे आवश्यक राहील व मंडळ अशा विद्यार्थ्यांसाठी ज्या अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा घेणार असेल तो अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व पालकांना उपलब्ध करुन देईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शा. पां. जोशी )
शासनाचे उप सचिव

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित-
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
सर्व विभागी सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक )
ग्राम विकास विभाग / आदिवासी विकास विभाग /सामाजिक न्याय विभाग /सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती- प्राशि-५